**राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाकरिता राज्यस्तरीय शिखर परिषद व कार्यकारी समिती, विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती व जिल्हा कौशल्य कार्यकारी समितीची पुनर्रचना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः कौविउ-२०१५/प्र.क्र.१४२/रोस्वरो-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १२ ऑगस्ट २०१५

**वाचा -**

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : कौविका-२०१०/(३/२०१०)/व्यशि-५ दिनांक १९ ५.२०१०
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : कौविका-२०१०/(१४२/२०१०)/ व्यशि-५ दिनांक ०९ ५.२०११
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : कौविका-२०१०/(११९/१०)/ व्यशि-५ दिनांक २१.५.२०११
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईओ-१०१५/प्र.क्र.०६/२०१५/दहा दिनांक १५.१.२०१५

**प्रस्तावना -**

रोजगाराबाबत बदलत्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच या कार्यक्रमाकडे अधिक प्रभावीपणे लक्ष पुरविले जावे या उद्देशाने केंद्र शासनाने स्वतंत्र कौशल्य विकास व उद्योजकता या मंत्रालयाची निर्मिती केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये देखील स्वतंत्र कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची स्थापना सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ क्र.४ येथील दि.१५.०१.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२ पर्यन्त संपूर्ण भारतातील जवळपास ५० कोटी व्यक्तींना रोजगार प्राप्त होण्यासाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. तसेच राज्यस्तरावर सदरचे उद्दिष्ट सन २०२२ पर्यन्त ४.५० कोटी एवढे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करावयाचे आहे.

२. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या संदर्भात राज्यास देण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावरील ध्येयधोरण, समन्वय व पर्यवेक्षण यासाठी तसेच त्याची संपूर्ण राज्यभरामध्ये जिल्हास्तरापर्यन्त अंमलबजावणी करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या उक्त संदर्भाधिन १ येथील दि. १९.५.२०१० च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली शिखर परिषद, मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यकारी समिती गठीत करण्यात आल्या आहेत.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये आता राज्यांतर्गत कौशल्य विकासाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यस्तरावर कौशल्य विकास व उद्योजकता या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली असून कौशल्य विकास व उद्योजकतेसंबंधी राज्यातील विविध

उपकमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि संनियत्रणाची जबाबदारी या नवनिर्मित विभागाकडे सोपविण्यात आली आहे. त्यामुळे आता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे गठीत करण्यात आलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या समित्यांची रचना पुनर्रचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर राज्यात कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पूर्वीच्या समित्यांची पुनर्रचना करुन विविध स्तरांवरील खालील समित्या नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर समित्यांची रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

**शिखर परिषदेची रचना :-**

| | | |
|---|---|---|
| १. | मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | उपाध्यक्ष |
| ३. | मा.मंत्री, शालेय शिक्षण | सदस्य |
| ४. | मा.मंत्री, वित्त व नियोजन | सदस्य |
| ५. | मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण | सदस्य |
| ६. | मा.मंत्री, उद्योग | सदस्य |
| ७. | मा.मंत्री, कामगार | सदस्य |
| ८. | मा.मंत्री, ग्राम विकास | सदस्य |
| ९. | मा.मंत्री, कृषि | सदस्य |
| १०. | मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता | सदस्य |
| ११. | मा.मुख्य सचिव | सदस्य |
| १२. | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| १३. | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| १४. | प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| १५. | प्रधान सचिव , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | सदस्य |
| १६. | प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | सदस्य |
| १७. | तज्ञ सदस्य/ उद्योग समूहाचे प्रतिनिधी (शासन नामनिर्देशित) | ५ सदस्य |
| १८. | शिक्षण क्षेत्रातील तज्ञ ( शासन नामनिर्देशित) | २ सदस्य |
| १९. | राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| २०. | आयुक्त, कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता संचालनालय | सदस्य |
| २१. | प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | सदस्य सचिव/ निमंत्रक |

टिप :- अध्यक्ष, आवश्यकतेनुसार या परिषदेच्या बैठकीसाठी कोणत्याही व्यक्तीस विशेष निमंत्रित म्हणून नामनिर्देशित करु शकतील.

**<u>शिखर परिषदेची कार्यकक्षा :-</u>**

१. कौशल्य विकास संदर्भातील राज्याचे धोरण ठरविणे व त्याच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेणे. तसेच, आवश्यकतेनुसार याबाबतच्या ध्येय धोरणामध्ये बदल/ सुधारणा सुचविणे.

२. कौशल्य विकासासंबंधी राज्याचा वार्षिक अंमलबजावणी आराखडा विचारात घेवून त्यास मान्यता देणे.

३. खाजगी संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच उद्योग समुहांचा कौशल्य विकास कार्यक्रमात सक्रिय सहभाग मिळविणेसाठी संबंधितांबरोबर विचार विनिमय करून ध्येय साधणे.

४. विविध मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांकडील तसेच उद्योग समूहांकडील पायाभुत सुविधा व साधनांचा महत्तम वापर करण्यासंबंधी अडचणींवर मात करण्यासाठी उपाय योजना करणे.

५. मंत्रालयीन विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या कौशल्य विकास योजनांचा आढावा घेवून त्यात एकसूत्रीपणा आणणे.

६ कौशल्य विकास अभियांनासंबंधी विविध विषयांवर/ मुद्दयांवर विचार विनिमय करुन उपाय योजना सुचविणे/ करणे.

**<u>राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीची रचना</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | उपाध्यक्ष |
| ३. | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव , उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग) | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव, उद्योग,उर्जा व कामगार विभाग ( कामगार) | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव , नियोजन विभाग | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| १०. | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ११. | प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | सदस्य |
| १२. | प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| १३. | कुलुगुरू,मुंबई विद्यापीठ मुंबई | सदस्य |
| १४. | कुलुगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ,लोणेरे | सदस्य |
| १५. | राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्रतिनिधी | सदस्य सचिव |
| १६. | आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १७. | अध्यक्ष, CII पश्चिम विभाग | सदस्य |
| १८. | अध्यक्ष, फिक्की, पश्चिम विभाग | सदस्य |
| १९. | अध्यक्ष, इंडियन मर्चट चेंबर्स | सदस्य |

**<u>राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीची कार्यकक्षा :-</u>**

१. राज्यामध्ये कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट ठरवून त्याकरिता कौशल्य विकास कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे, मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर परिषदेच्या मान्यतेने सदर आराखडयाची अंमलबजावणी करणे.

२. राज्यांत/ देशात/ परदेशात लागणा-या कुशल मुनष्यबळाच्या मागणीचे अनुमान (Manpower Mapping) काढून कौशल्य विकास कार्यक्रमाची आखणी करण्याकरिता उपाय योजना करणे .

३. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अंदाजित केलेल्या खर्चासाठी निधी उपलब्धतेचे विविध स्त्रोत निश्चित करणे ,जसे १) राज्य शासन, २) केंद्र शासन/ जागतिक बँक, ३) खाजगी उद्योग समूह/ औद्योगिक संघटना (PPP), इत्यादि.

४. आवश्यकतेनुसार कौशल्य अभियानाशी निगडीत विविध प्रकारचे निर्णय घेणे.

५. केंद्र शासनाकडून कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत वेळोवेळी प्राप्त होणा-या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत निर्णय घेणे.

६ कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये सहभागी होणारे उद्योग समूह/औद्योगिक आस्थापना, अशासकीय स्वयंसेवी संस्था किंवा शैक्षणिक संस्था इत्यादींना प्रोत्साहनात्मक सहाय्य देण्याच्या दृष्टीने धोरण ठरविणे.

७. कौशल्य विकास कार्यक्रमाचा आराखडा तयार करतांना भविष्यात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असणाऱ्या क्षेत्राकरिता नवीन अभ्यासक्रम तयार करणे, अभ्यासक्रमात सुधारणा करणे, प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत उपाययोजना सुचविणे इत्यादि.

८. रोजगार सेवायोजन केंद्राचे व्यवसाय मार्गदर्शन केंद्रांमध्ये रुपांतर करण्यासाठी सहाय्य व समन्वयन करणे.

९. कौशल्य विकास कार्यक्रमाची राज्यामध्ये यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले कायदे करण्यासंदर्भात शिफारशी करणे.

१०. कौशल्य विकास अभियानाच्या अंमलबजावणीशी निगडीत बाबी तसेच येणाऱ्या विविध अडचणींबाबत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार विविध उप समित्या गठीत करणे.

११. विविध विभागांमार्फत राबविल्या जाणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण योजना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या एका छत्राखाली आणून त्यांची एकात्मिकरित्या प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

## विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समितीची रचना

| | | |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २. | विभागातील सर्व जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३. | संबंधित महानगरपालिका आयुक्त | सदस्य |
| ४. | सह/उप संचालक, शिक्षण विभाग | सदस्य |
| ५. | सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण | सदस्य |
| ६. | सहसंचालक,उच्च शिक्षण | सदस्य |
| ७. | सहसंचालक, तंत्र शिक्षण | सदस्य |
| ८. | विभागीय सहसंचालक उद्योग विभाग | सदस्य |
| ९. | विभागीय कृषि सहसंचालक,कृषि विभाग | सदस्य |
| १०. | विभागीय समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ११. | उप आयुक्त, महिला व बाल कल्याण | सदस्य |
| १२. | सह/उप संचालक सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| १३. | विभागीय आयुक्त, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| १४. | अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग | सदस्य |
| १५. | प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन | सदस्य |
| १६. | उप आयुक्त, मत्स्यसंवर्धन | सदस्य |
| १७. | प्रतिनिधी Confederation of Indian Industry (CII) | सदस्य |
| १८. | विभागीय स्तरावरील दोन औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १९. | संबंधित प्रादेशिक स्तरावरील नामांकित उदयोजक | २ सदस्य |
| २०. | संबंधीत उप संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय मुख्यालय . | सदस्य सचिव |

## विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समितीची कार्यकक्षा :-

१. जिल्हानिहाय कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

२. विभागातील कुशल मनुष्यबळाची मागणी लक्षात घेऊन सेक्टर निहाय प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीमध्ये जिल्हा कौशल्य कार्यकारी समितीस मार्गदर्शन करणे.

३. विभागातील सर्व जिल्ह्यांच्या कौशल्य विकासाचा आराखडा तयार करुन घेणे व त्याआधारे विभागाचा आराखडा तयार करणे.

४. विभागीय कौशल्य विकास समितीने त्यांच्या विभागाचा त्रैमासिक प्रगती अहवाल कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे पाठविणे.

५. राज्याच्या कौशल्य विकासासंबंधी ध्येय-धोरणानुसार विभागातील सर्व संबंधित विभागांच्या समन्वय व संनियंत्रणाद्वारे विविध उपक्रमांची अंमलबजावणी करुन घेणे.

## जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची रचना

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्याधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी,महानगर पालिका/नगरपालिका /जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ४. | जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी | सदस्य |
| ५. | प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( जिल्हास्तरीय) | सदस्य |
| ६. | जिल्हा कृषि, पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| ७. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ८. | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| ९. | प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| १०. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ११. | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| १२. | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक जिल्हा विकास प्रकल्प आदिवासी विभाग | सदस्य |
| १३. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | सदस्य |
| १४. | प्रतिनिधी Confederation of Indian Industry (CII) | सदस्य |
| १५. | जिल्हयातील किमान दोन प्रख्यात स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी (जिल्हयाधिकारी नामनिर्देशित करतील). | सदस्य |
| १६. | जिल्हयामधील तीन औद्योगिक संघटनाचे प्रतिनिधी ( उद्योग संघटना, बिल्डर असोसिएशन इ.) ,जिल्हयाधिकारी नामनिर्देशित करतील. | सदस्य |
| १७. | सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र. | सदस्य सचिव |

## जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची कार्यकक्षा :-

१. राज्य कौशल्य विकास कार्यक्रमाची जिल्हा स्तरावर अंमलबजावणी करणे व विविध माध्यमामार्फत जिल्हास्तरावर प्रसिध्दी देणे.

२. राज्यस्तरावरुन ठरवून दिलेले कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट गाठण्याकरिता जिल्हा निहाय कौशल्य विकास आराखडा (District Skill Development Plan) व अंमलबजावणी करिता उपाययोजना करणे.

३. राज्य शासनाकडून कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत वेळोवेळी प्राप्त होणा-या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे व आढावा घेणे.

४. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अंदाजित केलेल्या खर्चासाठी निधी उपलब्धतेचे स्त्रोत निश्चित करणे, जसे की, जिल्हा योजना, खाजगी उद्योग समूह / औद्योगिक संघटना, NGO.

५. प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे जिल्हास्तरावर नियोजन करणे व त्याद्वारे

ठरावीक मागणी क्षेत्रात प्रशिक्षण संस्था / तज्ञ यांची उपलब्धतेनुसार उणीव भरुन काढणे.

६. कुशल मनुष्यबळास रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सहाय्य, मार्गदर्शन, नियंत्रण करणे, त्याअनुषंगाने उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार मिळून देण्याकरिता खाजगी आस्थापनांच्या सहकार्याने भरती/ स्वयंरोजगार मेळावे आयोजित करणे, तसेच उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याकरिता उद्योग समूहांशी समन्वय साधणे.

७. कौशल्य विकास अभियानाची प्रभावी व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्ह्याच्या विविध विभागातील अधिकाऱ्यांचे संघ तयार करुन त्यांचेमार्फत अभियानाच्या कार्यक्षम संचलनाची व्यवस्था करणे.

८. कौशल्य अभियानात सहभागी प्रशिक्षण संस्था / तज्ञ, मुल्यमापक इत्यादींमार्फत सर्व जबाबदाऱ्या अचूकपणे, कार्यक्षमतेने व निष्ठेने पार पाडत असल्याची खात्री करण्यासाठी भेटी, आढावा इत्यादीद्वारे संनियंत्रण करणे व त्याबाबत वेळोवेळी आढावा घेणे.

९. विभागीय कौशल्य विकास समितीस आपल्या जिल्हयाचा त्रैमासिक प्रगती अहवाल व आराखडा सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८१३१६१६३७२४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2015.08.13 16:19:14 +05'30'

**सं. छ. तडवी**

शासनाचे अवर सचिव

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव ,मंत्रालय, मुंबई,
२. सर्व संबंधित मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई,
३. मा.मुख्य सचिव , मंत्रालय , मुंबई,
४. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई
७. महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई/ नागपूर,
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था,

९. विभागीय आयुक्त मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,नागपूर व अमरावती,

१०. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालयामार्फत),

११.आयुक्त, सर्व महानगर पालिका (कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालयामार्फत),

१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व महानगर पालिका/ नगर परिषद/जिल्हा परिषद (कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालयामार्फत,)

१३. उपरोक्त समित्यामधील सर्व शासकीय सदस्य,

१४.उपरोक्त समित्यामधील सर्व अशासकीय सदस्य,

१५.संचालक (प्रशिक्षण ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,

१६.उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता , विभागीय मुख्यालय , मुंबई/पुणे/ नागपूर/अमरावती/औरंगाबाद/ नाशिक,

१७.सहसंचालक/ उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/ नागपूर/अमरावती/औरंगाबाद/ नाशिक,

१८. सहाय्यक संचालक, सर्व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केन्द्र,

१९.कार्यासन अधिकारी, प्रशा-१/ प्रशा-२/ रोस्वरो-१/रोस्वरो-२, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई

२०.निवड नस्ती / अभियान-१